**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**सहाव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर कार्यवाहीसंबंधात स्पष्टीकरणात्मक ज्ञापन**

१. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झ (१) आणि अनुच्छेद २४३-म (१) अनुसार व महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतूद) अधिनियम, १९९४ अनुसार राज्याने महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण तरतूद) अधिनियम, १९९४ मधील तरतुदीनुसार मा. मंत्रीमंडळाची दि.१८ फेब्रुवारी, २०२५ रोजी मान्यता घेवून तसेच मा. राज्यपाल यांची मान्यता घेऊन, शासन अधिसूचना दि.२७ मार्च, २०२५ अन्वये सहावा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग गठीत करुन, श्री.मुकेश खुल्लर (भा.प्र.से.) यांची सहाव्या महाराष्ट्र वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणून तसेच सदस्य म्हणून अपर मुख्य सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, प्रधान सचिव ग्राम विकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई व प्राध्यापक श्री.एस.चंद्रशेखर, अर्थतज्ञ, इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली होती.

सदर अधिसूचनेन्वये आयोगाने त्यांचा अहवाल राज्यपालांना दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. परंतु, अध्यक्ष श्री. मुकेश खुल्लर यांच्या अकाली निधनाने रिक्त झालेल्या सहाव्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या अध्यक्ष पदावर डॉ. नितीन करीर, सेवानिवृत्त भा.प्र.से. यांची शासन अधिसूचना दि. ३१ जुलै, २०२५ अन्वये नियुक्ती करण्यात आली. आयोगाने त्यांचा अहवाल मा.राज्यपालांना दि.३१ मार्च, २०२६ पर्यंत सादर करण्यास मुदत देण्यात आली होती. अध्यक्ष, सहावा महाराष्ट्र राज्य वित्त आयोग यांनी दि.१८.२.२०२६ रोजी मा. राज्यपाल महोदय यांना आपला इंग्रजी अहवाल वित्तीय व प्रशासकीय भार असणाऱ्या शिफारशींसह दि.१ एप्रिल, २०२६ पासून सुरु होणाऱ्या पाच वर्षाच्या कालावधीसाठी सादर केला आहे. तदनंतर भाषा संचालनालय, मुंबई यांचेकडून अहवालाचे मराठी भाषांतर करून घेण्यात आले आहे.

२. ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करुन त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजनांसंदर्भात शिफारशी करणे हा आयोग स्थापनेमागचा मुख्य उद्देश आहे.

३. आयोगाने सन २०२६-२०३१ या कालावधीचा अहवाल दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. राज्यपालांना सादर केला आहे व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-झ (४) आणि अनुच्छेद २४३-म (२) अनुसार आयोगाचा अहवाल व अहवालातील शिफारशींवर कार्यवाहीसंबंधात स्पष्टीकरणात्मक ज्ञापन विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवण्याचे याव्दारे प्रस्तावित करण्यात येत आहे.

४. **आयोगाच्या शिफारशी खालीलप्रमाणे सहा प्रमुख क्षेत्रांशी संबंधित आहेत -**

(१) स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्याच्या स्वतःच्या कर महसुलातील वाटप - (शिफारस क्र.१),

(२) कर-अभिहस्तांकन व हस्तांतरण - (शिफारस क्र.२ ते ९),

(३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वतःच्या उत्पन्नात वाढ - (शिफारस क्र.१० ते २३)

(४) संस्थात्मक बळकटीकरण, प्रणाली व क्षमता विकास - (शिफारस क्र.२४ ते ३७),

(५) राज्य वित्त आयोग यंत्रणेचे बळकटीकरण - (शिफारस क्र. ३८ व ३९)

(६) राज्य वित्त, सनियंत्रण व वित्तीय व्यवस्थापनाशी संबंधित उपाययोजना - (शिफारस क्र. ४० ते ४२)

५. आयोगाने ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थव्यवस्थेचे मुल्यांकन, स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखा, लेखापरीक्षण, सर्वसाधारण निरीक्षण याअनुषंगाने शिफारशी केल्या आहेत. आयोगाच्या शिफारशींचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे :-

**अ) शासनावर आर्थिक भार असणाऱ्या शिफारशी - ९**

**ब) प्रशासकीय सुधारणांविषयी शिफारशी - ३३**

**एकूण शिफारशी -४२**

**वरील शिफारशीसंबंधात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-**

**५.१. शासनावर प्रत्यक्ष आर्थिक भार असणाऱ्या शिफारशी एकूण - ९**

**५.१.१ स्वीकृत शिफारशी - ५**

( शिफारस क्र. (१) ६.५, (२) ७.९, (३) ७.१२, (४) ७.१७,(५) ७.२४)

**५.१.२. अंशतः स्वीकृत शिफारशी - ३**

( शिफारस क्र. (१) ७.६, (२) ७.२१, (३) ७.२६)

**५.१.३. कार्यवाही पूर्ण झालेल्या शिफारशी - निरंक**

**५.१.४ अस्वीकृत शिफारशी – १**

( शिफारस क्र. (१) ७.१४,)

**५.२. प्रशासकीय सुधारणांविषयी असणाऱ्या शिफारशी एकूण - ३३**

**५.२.१. स्वीकृत शिफारशी - ३३**

( शिफारस क्र. (१) ८.५(२) ८.६,(३) ८.७, (४) ८.९, (५) ८.११, (६) ८.१३, (७) ८.१४, (८) ८.१६, (९) ८.२०, (१०) ८.२३ (११) ८.२५ (१२) ८.२८, (१३) ८.३०. (१४) ८.३३, (१५) ९.८, (१६) ९.११, (१७) ९.१४, (१८) ९.१६,९.१९,९.२१,९.२३, (१९) ९.२६, (२०) ९.३०, (२१) ९.३४, (२२) ९.३८, (२३) ९.४१, (२४) ९.४४, (२५) ९.४७, (२६) ९.५०,(२७) ९.५४, (२८) ९.५७, (२९) १०.०८, (३०) १०.०९, (३१) ११.२, (३२) ११.४, (३३) ११.६)

**५.२.२. अंशतः स्वीकृत शिफारशी - निरंक**

५.२.३. **कार्यवाही पूर्ण झालेल्या शिफारशी – निरंक**

५.२.४. **अस्वीकृत शिफारशी – निरंक**

६. या अहवालाव्दारे मांडण्यात आलेल्या एकूण ४२ शिफारशींच्या ( आर्थिक व प्रशासकीय )अनुषंगाने सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी या शिफारशीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना योग्य आणि विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन, त्याचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

७. सदर शिफारशी सन **२०२६-२७** ते सन **२०३०-३१** या कालावधीसाठी लागू करण्यात येत आहेत.

ठिकाण : मंत्रालय, मुंबई.
दिनांक : 10 जुलै, २०२६

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**FINANCE DEPARTMENT**

## EXPLANATORY MEMORANDUM REGARDING ACTION TAKEN ON THE RECOMMENDATIONS SUBMITTED IN THE REPORT OF THE SIXTH MAHARASHTRA STATE FINANCE COMMISSION

In accordance with Article 243-I (1) and Article 243-Y (1) of the Constitution of India, and pursuant to the provisions of the Maharashtra Finance Commission (Miscellaneous Provisions) Act, 1994, the State Government, after obtaining the approval of the Hon. Cabinet on February 18, 2025, and the approval of the Hon. Governor, constituted the Sixth Maharashtra State Finance Commission vide Government Notification dated March 27, 2025 Shri Mukesh Khullar (I.A.S.) was appointed as the Chairman of the Sixth Maharashtra Finance Commission The following members were also appointed -

- Additional Chief Secretary (UD-2), Urban Development Department, Mantralaya, Mumbai
- Principal Secretary, Rural Development and Panchayati Raj Department, Bandhkam Bhavan, Mantralaya, Mumbai
- Professor Shri S. Chandrasekhar, Economist, Indira Gandhi Institute of Development Research (IGIDR), Mumbai.

As per notification, the Commission was initially given a deadline until 31 December, 2025, to submit its report to the Governor However, due to the untimely demise of the Chairman, Shri Mukesh Khullar, Dr. Nitin Kareer, retired I.A.S., was appointed to the vacant post of Chairman of the Sixth Maharashtra State Finance Commission vide Government Notification dated 31 July, 2025. Consequently, the Commission was granted an extension until 31 March, 2026, to submit its report to the Hon. Governor. The Chairman of the Sixth Maharashtra State Finance Commission submitted the English version of the report, containing recommendations carrying financial and administrative implications, to the Hon. Governor on 18 February, 2026, for a five-year period commencing from 1 April, 2026. Subsequently, the Marathi translation of the report was obtained from the Directorate of Languages, Mumbai.

2. The primary objective behind establishing the Commission is to review the financial position of rural and urban local self-government institutions and to make recommendations regarding measures to improve their financial status.

3. The Commission submitted its report for the period 2026–2031 to the Hon. Governor on February 18, 2026. In accordance with Article 243-I (4) and Article 243-Y (2) of the Constitution of India, it is hereby proposed to lay the Commission's report along with Explanatory Memorandum regarding the action taken on the recommendations before both houses of the State Legislature.

4. **The recommendations of the Commission are grouped under the following six major sectors:**

**(1) Devolution of the State's Own Tax Revenue to Local Self-Government Institutions** – (Recommendation No. 1)

**(2)Tax Assignment and Transfers** – (Recommendation Nos. 2 to 9)

**(3)Augmentation of the Own Revenue of Local Self-Government Institutions** – (Recommendation Nos. 10 to 23)

**(4)Institutional Strengthening, Systems Improvement and Capacity Development** – (Recommendation Nos. 24 to 37)

**(5)Strengthening the State Finance Commission Mechanism** – (Recommendation Nos. 38 and 39)

**(6) Measures Relating to State Finances, Fiscal Oversight and Financial Management** – (Recommendation Nos. 40 to 42)

5. The Commission has made recommendations concerning the assessment of the economy of rural and urban local self-government institutions, their accounting, auditing, and general inspection. The summary of the Commission's recommendations is as follows :-

**A) Recommendations involving financial implications for the Government: 9**

**B) Recommendations regarding administrative reforms: 33**

**Total Recommendations: 42**

**The Government has taken the following decisions regarding the above recommendations:**

**5.1. Total recommendations involving direct financial implications for the Government: 9**

**5.1.1 Accepted Recommendations: 5**

*(Recommendation Nos. (1) 6.5, (2) 7.9, (3) 7.12, (4) 7.17, (5) 7.24)*

**5.1.2 Partially Accepted Recommendations: 3**

*(Recommendation Nos. (1) 7.6, (2) 7.21, (3) 7.26)*

**5.1.3 Action Completed Recommendations: Nil**

5.1.4 **Not Accepted Recommendations: 1**

*(Recommendation Nos. (1) 7.14)*

**5.2. Total recommendations regarding administrative reforms: 33**

**5.2.1 Accepted Recommendations: 33**

*(Recommendation Nos. (1) 8.5, (2) 8.6, (3) 8.7, (4) 8.9, (5) 8.11, (6) 8.13, (7) 8.14, (8) 8.16, (9) 8.20, (10) 8.23, (11) 8.25, (12) 8.28, (13) 8.30, (14) 8.33)*

*(15) 9.8, (16) 9.11, (17) 9.14, (18) 9.16, 9.19, 9.21, 9.23, (19) 9.26, (20) 9.30, (21) 9.34, (22) 9.38, (23) 9.41, (24) 9.44, (25) 9.47, (26) 9.50, (27) 9.54, (28) 9.57, (29) 10.08, (30) 10.09, (31) 11.2, (32) 11.4, (33) 11.6.*

**5.2.2 Partially Accepted Recommendations: Nil**

**5.2.3 Action Completed Recommendations: Nil**

**5.2.4 Not Accepted Recommendations: Nil**

6. In the context of the total 42 recommendations (financial and administrative) presented in this report, all concerned administrative departments must adopt appropriate and prescribed procedures and strictly adhere to them while implementing these recommendations.
7. These recommendations shall remain in force for the period **2026–27 to 2030–31**.

**Place:** Mantralaya, Mumbai
**Date:** 10 July 2026

**Devendra Fadnavis**
Chief Minister
State of Maharashtra

## परिशिष्ट-अ

### आर्थिक भार असलेल्या शिफारशी :-

### अ(१). आर्थिक भार असलेल्या स्वीकृत शिफरशी

| अ. क्र. | शि. क्र. | शिफारशी | शिफारशींवर विभागाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|
| १. | **शिफारस क्र. १ (६.५)** | राज्य शासनाच्या स्वतःच्या कर महसुलाच्या २७.३% भाग स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित करावा अशी शिफारस आयोग करतो. ही शिफारस दिनांक ०१ एप्रिल, २०२६ पासून सुरु होणाऱ्या पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी लागू आहे.<br>आयोगाच्या मुल्यांकनानुसार, सध्या राज्य सरकार विविध हस्तांतरणांमार्फत स्वतःच्या कर महसुलाच्या अंदाजे २६.३% निधी स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित करते. निधी हस्तांतरणाचा हा सध्याचा दर कायम ठेवला पाहिजे. या हस्तांतरणांमधील स्वतःच्या कर महसुलाच्या अंदाजे २% निधी ऐच्छिक आधारावर दिला जातो. आयोगाच्या विश्लेषणानुसार व या उद्देशासाठी नियुक्त केलेल्या अभ्यास समितीनुसार, आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, सरासरी वार्षिक सुमारे ₹ ८,२१७ कोटी इतका निधी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कमी पडतो (underspending), जो राज्याच्या स्वत:च्या सरासरी कर उत्पन्नाच्या ३.६% आहे, ही बाब, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय व्यवस्थेतील संसाधनांची सततची कमतरता दर्शविते. या ३.६% तुटीपैकी अंदाजे २.६% तूट पुढील शिफारशींमधून भरुन निघेल ०.८% व्यवसाय कराचे हस्तांतरण, ०.६% वाहन करातून रस्त्यासाठी अनुदान आणि १.२% कर व करेतर उत्पन्नाच्या संकलनातील वाढ व कार्यक्षमतेद्वारे उपलब्ध होईल. उरलेली १% तूट ही राज्याने स्वत:च्या कर उत्पन्नातून स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करणे आवश्यक आहे.<br>आयोग अशी शिफारस करतो की, राज्याच्या स्वत:च्या कर उत्पन्नाचे स्थानिक स्वराज्य संस्थांना करावयाचे अतिरिक्त १% हस्तांतरण तसेच पूर्वीपासून होत असलेल्या २% रकमेचे हस्तांतरण हे खालील सूत्रानुसार केले जावे :<br>१) ५५% नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना व ४५% ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना दिला जाईल.<br>२) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वितरित केलेल्या निधीपैकी ५% निधी हा कार्यात्मक अनुदान (Performance Grant) म्हणून राखून ठेवला जाईल.<br>३) नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वितरित केलेल्या निधीपैकी आणखी ५% निधी हा ग्रामीण भागाचे नागरी भागात संक्रमण यासाठी आरक्षित असेल.<br>ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत केलेल्या निधीचे वितरण पुढीलप्रमाणे असेल : ७०% ग्रामपंचायत , १५% पंचायत समिती आणि १५% जिल्हा परिषद.<br>ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील वितरण खालील सूत्रावर आधारित असेल :<br>• नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी - लोकसंख्या ५०%, क्षेत्रफळ २०% आणि राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सर्वाधिक दरडोई | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपाची असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>राज्य शासन स्वतःच्या कर महसूलापैकी २६.३% हिस्सा स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित करीत आहे. आयोगाच्या शिफारशीनुसार सदर रक्कमेपैकी २% रक्कम तसेच राज्य शासनाच्या कर महसूल रक्कमेच्या १% अतिरीक्त रक्कम अशी एकूण ३% रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना शिफारशीतील सूत्रानुसार उपलब्ध करण्यात यावी.<br>नगर विकास व ग्राम विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध करुन द्यावयाचा स्वेच्छाधीन निधीकरीता विहीत मार्गाने अर्थसंकल्पात तरतूद करावी. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध होणा-या स्वेच्छाधीन निधीच्या वाटपाबाबतच्या विहीत सूत्राच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात. |

| अ. क्र. | शि. क्र. | शिफारशी | शिफारशींवर विभागाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|
| | | महसुली उत्पन्न व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचे दरडोई महसुली उत्पन्न यामधील तफावत (३०%)<br>• ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी - लोकसंख्या ५०%, क्षेत्रफळ २०% आणि राज्यातील जिल्ह्याचे सर्वाधिक दरडोई उत्पन्न व संबंधित जिल्ह्याचे दरडोई महसुली उत्पन्न यामधील तफावत (३०%)<br>सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत), नगर पंचायती, नगर परिषदा (वर्ग अ, ब आणि क ) आणि महानगरपालिका (वर्ग क आणि ड) यांच्यासाठी निधी पूर्णपणे अनिर्बंध आणि विनाअट असेल.<br>महानगरपालिका (वर्ग अ+, अ आणि ब) यांच्यासाठी निधीचे वाटप स्वतंत्रपणे निर्दिष्ट केलेल्या सुधारणांच्या आधारे काटेकोरपणे केले जाईल. राज्य सरकार या सुधारणांच्या अटी इतर महानगरपालिका, नगरपरिषद (वर्ग अ) यांना पुढील ३ वर्षांच्या कालावधीत लागू करू शकेल. | |
| २ | *<br>**शिफारस क्र. ३ (७.९)** | स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीच्या अतिरिक्त मुद्रांक शुल्काकरीता एक बहुस्तरीय निधी प्रवाह यंत्रणा अवलंबली जाते, ज्यामध्ये जमा झालेली रक्कम राज्याच्या एकत्रित खात्यात जमा केली जाते आणि त्यानंतर, नगर विकास विभाग (UDD) थेट शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वितरित करतो. परंतु ग्राम विकास आणि पंचायत राज विभाग (RDD) नोंदणी महानिरीक्षक (IGR) यांच्या कार्यालयामार्फत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वितरित करतो. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी वाटपासाठी विलंब होतो व निधी कमी मिळतो.<br>आयोग अशी शिफारस करतो की, '**अतिरिक्त मुद्रांक शुल्क**' ही संज्ञा सर्व संबंधित कायद्यांमध्ये स्वीकारली जावी. अतिरिक्त मुद्रांक शुल्काचे हस्तांतरण -स्वयंचलित थेट हस्तांतरण यंत्रणा॰ द्वारे केले जावे. यास्तव, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करावे आणि शासकीय जमा लेखा प्रणाली (GRAS) द्वारे वसुलीच्या वेळी मूळ आणि अतिरिक्त मुद्रांक शुल्क वेगवेगळे करावे आणि व्हर्च्युअल ट्रेझरीने अतिरिक्त मुद्रांक शुल्क संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना अल्पावधीत (Real Time) थेट हस्तांतरित करावे. | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपाची असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अतिरिक्त मुद्रांक शुल्काशी संबंधित स्थानिक स्वराज संस्थांना अर्थसंकल्पीय तरतूदीतून दरमहा अनुज्ञेय निधी वेळेवर अदा होण्याकरीता संगणकीय प्रणाली तयार करण्यात यावी. |
| ३ | *<br>**शिफारस क्र. ४ (७.१२)** | महाराष्ट्र शासनाने राजपत्रित अधिसूचना दिनांक ३१.१२.२०२५ द्वारे निवासी, व्यापारी व औद्योगिक इमारतींसाठी बिगर शेती कर पूर्णपणे रद्द करावा, असा निर्णय घेतला असून त्याऐवजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४७ अंतर्गत जमिनीचा वापर शेती ऐवजी बिगर शेती कारणांसाठी करताना एकरकमी अधिमूल्य एकदाच आकारावे असे प्रस्तावित केले आहे.<br>जमिनीच्या वापराच्या बदलावर आकारल्या जाणाऱ्या आणि वसूल केल्या जाणाऱ्या एकरकमी अधिमूल्याच्या १०% अतिरिक्त उपकर लावणे अनिवार्य करण्याची शिफारस आयोग करतो. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अतिरिक्त उपकराची (एकरकमी अधिमूल्याच्या १०%) नोंद करण्यासाठी एक स्वतंत्र लेखाशीर्ष तयार केले जावे, अशीही शिफारस आयोग करतो. तसेच, शासकीय जमा लेखा प्रणाली (GRAS) द्वारे एकरकमी अधिमूल्य वसूल करताना, प्रणालीमध्ये एकरकमी अधिमूल्य आणि अतिरिक्त उपकर स्वतंत्रपणे ओळखले गेले पाहिजे आणि व्हर्च्युअल ट्रेझरीने १०% अतिरिक्त | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपाची असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>महसूल व वन विभाग, शासन अधिसूचना, दिनांक ३१.१२.२०२५ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील अकृषिक वापराची परवानगी व अकृषिक कर आकारणी करण्यासंबंधीच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, शासनास प्राप्त होणाऱ्या रुपातंरण अधिमूल्याची शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामध्ये विभागणी करण्यात येणार आहे. सदर अधिमुल्याच्या रक्कमेवर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १०% वेगळ्याने उप कर आकारण्यात यावा. |

| अ. क्र. | शि. क्र. | शिफारशी | शिफारशींवर विभागाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|
| | | उपकराची रक्कम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना अल्पावधीत (Real Time) थेट हस्तांतरित केली पाहिजे. | यानुषंगाने अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी नगर विकास व ग्रामविकास विभागाने महसूल व वन विभागास प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही करावी. |
| ४ | * **शिफारस क्र. ६** (७.१७) | मोटार वाहन कर पूर्णपणे राज्य सरकार आकारते व वसूल करते. स्थानिक स्वराज्य संस्थांना सदर कर वसूल करण्यास मनाई आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मोटार वाहन कराच्या १०% इतकी रक्कम रस्ते अनुदान म्हणून प्राप्त होते. आयोग अशी शिफारस करतो की, मोटार वाहन कराच्या ४ % रक्कम ही ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना (फक्त जिल्हा परिषदांना) रस्ते अनुदान म्हणून दिली जावी. तसेच, शिफारस क्र. १ मध्ये नमूद केलेल्या निधीवाटप सूत्रानुसार निधीचे वाटप केले जावे. | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपातील असून, स्विकृत करण्यात यावी.**<br>ग्राम विकास विभागास त्यांच्या १९५८ च्या कायद्यानुसार प्रति ग्रामपंचायत निधी उपलब्ध करुन दिला जातो. राज्यात वसूल होणाऱ्या एकूण मोटार वाहन कराच्या ४ % रक्कम ही ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांना (जिल्हा परिषदांना) रस्ते अनुदान म्हणून उपलब्ध करण्यात यावे. त्यानुषंगाने ग्राम विकास विभागाने गृह (परिवहन) विभागाशी समन्वय साधून, कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही करावी. |
| ५ | * **शिफारस क्र. ८** (७.२४) | स्थानिक स्वराज्य संस्थांना ₹ १२,००० कोटी इतका निधी जिल्हा नियोजन समितीच्या (DPC) माध्यमातून मिळतो असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. परंतु, या निधीचे वाटप सूत्रावर आधारित नसल्यामुळे भांडवली नियोजनामध्ये अनिश्चितता निर्माण होते व त्यामुळे संतुलित प्रादेशिक विकासाला बाधा पोहोचते.<br>आयोग शिफारस करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या (DPC) माध्यमातून मिळणाऱ्या निधीचे वितरण करण्यासाठी, प्रकरण ६ मध्ये सुचवलेल्या प्रमाणित हस्तांतरण सूत्राचा वापर ठराविक कालावधीनंतर टप्प्याटप्प्याने केला जावा, जेणेकरून निधीचे समान आणि गरजेनुसार वाटप सुनिश्चित होईल. | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>शिफारशीतील सुचविलेल्या सूत्राची अंमलबजावणी करण्यापूर्वी, नियोजन विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जिल्हा नियोजन समितीच्या (DPC) माध्यमातून मिळणाऱ्या निधीचे वितरण करण्यासाठी सदर सूत्राची सर्वंकष तपासणी करावी. |

## अ(२). आर्थिक भार असलेल्या अंशत: स्विकृत शिफारशी

| अ. क्र. | शि. क्र. | शिफारशी | शिफारशींवर विभागाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|
| १ | * **शिफारस क्र. २** (७.६) | सन १९७५ पूर्वी, व्यवसाय कर स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे आकारला जात होता आणि वसूल केला जात होता. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५ हा कायदा पारित झाल्यावर व्यवसाय कर वसूल करण्याचे काम राज्य शासनाकडे सोपविण्यात आले. वित्त आयोग शिफारस करतो की, व्यवसाय कराची वसूली स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरीत करावी. तथापि, राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांकडून व्यवसाय कर वसूल करण्याचा अधिकार राज्याकडेच ठेवावा आणि बहु-स्थानिक व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र (PTRC) धारकांसाठी स्वतंत्र यंत्रणा विकसित करावी. घटनेच्या कलम २७६ नुसार तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्य शासनाला वाटले तर राज्य शासन स्वतःचा कर आकारणीचा अधिकार कायम ठेवू शकते व स्थानिक स्वराज्य संस्था राज्य शासनाच्या वतीने तो कर वसूल करु शकतात. | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपाची असून, अंशत: स्वीकृत करण्यात यावी.**<br>स्थानिक स्वराज्य संस्थांना व्यवसाय कर वसुलीचे संपूर्ण अधिकार न देता, व्यक्तिगत व्यावसायिक व व्यापाऱ्यांशी संबंधित PTEC नोंदणी, प्रशासन व वसुलीची जबाबदारी नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करण्यात यावी. त्याचप्रमाणे, PTRC (Profession Tax Registration Certificate) अंतर्गत राज्य शासनाकडून करण्यात येणाऱ्या वसुलीच्या ०.८ % इतकी रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरीत करण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | * शिफारस क्र. ७ (७.२१) | १५ व्या वित्त आयोगाच्या राष्ट्रीय आपत्ती आणि जोखीम व्यवस्थापन निधीमुळे व राज्य आपत्ती आणि जोखीम व्यवस्थापन निधीमुळे राज्य-स्तरीय आपत्ती आणि जोखीम निधीला बळकटी मिळते. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका आपत्ती आणि जोखीम व्यवस्थेमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण म्हणजे पहिल्यांदा प्रतिसाद देणारी अशी असते. तरीही त्यांना मर्यादित निधी सहाय्य मिळते. यामुळे आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना तयार करण्यासाठी निधीचे वाटप करण्यास प्राधान्य देण्याची गरज आहे. आयोग शिफारस करतो की, मदत आणि पुनर्वसन विभागाने राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीचा (SDMF) दोन-तृतीयांश भाग स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित करावा, तर एक-तृतीयांश भाग राज्य स्तरावर ठेवावा. ग्रामीण विकास विभाग आणि नगर विकास विभागाने, हस्तांतरित केलेल्या SDMF चे स्थानिक स्वराज्य संस्थांना जोखीम-आधारित वितरण करण्यासाठी, आपत्ती जोखीम निर्देशांक (केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार) तयार करावा. | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपातील असून, अंशत: स्वीकृत करण्यात यावी.**<br>मदत व पुर्नवसन विभागाने सद्यस्थितीत प्रथम टप्प्यात राज्य आपत्ती सौम्यीकरण निधीचा (SDMF) दोन-तृतीयांश भाग राज्य स्तरावर ठेवून एक-तृतीयांश भाग स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित करावा. |
| ३ | * शिफारस क्र. ९ (७.२६) | महाराष्ट्र शासनाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी २०१९ मध्ये एक केंद्रीकृत, तंत्रज्ञान-आधारित ई-चलन प्रणाली सुरू केली. या प्रणालीचा उद्देश रस्ते सुरक्षा वाढवणे आणि पारदर्शक अंमलबजावणी करणे असा असला तरी, प्रलंबित दंड वसूल करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणांशी समन्वय साधणे कठीण होत असल्याने सरासरी वसुलीचा दर ३६% इतका कमी आहे. आयोग अशी शिफारस करतो की, प्रलंबित वाहतूक ई-चलनांची थकबाकी वसूल करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना वैधानिक अधिकार देण्यात यावेत आणि त्यासाठी त्यांना सध्याच्या महाट्रॅफिक ॲपचा (MahaTraffic App) लॉगिन ॲक्सेस देण्यात यावा. आयोग अशीही सूचना करतो की, राज्याने एक सक्षम नियम तयार करावा, ज्यानुसार वसूल झालेल्या एकूण थकबाकीच्या २०% रक्कम अतिरिक्त सेवा शुल्क म्हणून आकारावा आणि ही रक्कम थेट थकबाकी वसूल करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेला विनाअट अनुदान (Untied Grants) म्हणून दिली जावी. | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपातील असून, अंशत: स्वीकृत करण्यात यावी.**<br>सदर शिफारशीच्या अनुषंगाने ज्या वाहतूक ई-चलनाची रक्कम एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित आहे, अशी थकबाकी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून वसूल करण्यात यावी. सदर वसुलीतून २० % रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वत:कडे ठेवून उर्वरित रक्कम राज्य शासनाच्या एकत्रित निधीत जमा करावी. त्यानुषंगाने, कायद्याचा अभ्यास करुन त्यातील आवश्यक त्या तरतूदींमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही नगर विकास, ग्रामविकास व गृह (परिवहन) विभागाने विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने करावी. |

## अ(३). आर्थिक भार असलेल्या अस्वीकृत शिफारशी

| अ. क्र. | शि. क्र. | शिफारशी | शिफारशींवर विभागाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|
| १ | * शिफारस क्र. ५ (७.१४) | महाराष्ट्र शासनाच्या कायद्यानुसार जमीन महसूल उपकर स्थानिक स्वराज्य संस्थांना देय असलेल्या रकमेवर आधारित हस्तांतरीत करणे बंधनकारक असले तरीही सध्या राज्य शासन हा उपकर प्रत्यक्ष जमा झालेल्या रकमेच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांना हस्तांतरित करते.<br>-जमीन महसूल उपकर॰ ही संज्ञा सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित सर्व कायद्यांमध्ये प्रमाणित करावी अशी आयोग शिफारस करतो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना हा उपकर जमीन महसूल मागणीनुसार वितरित व्हावा. विद्यमान कायदेशीर तरतुदीनुसार सर्व वार्षिक मागण्या ग्राम विकास विभाग व नगर विकास विभागाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट करुन स्थानिक स्वराज्य संस्थांना 'जमीन महसुलावरील उपकर' मागणीनुसार वितरित करावा. | **सदर शिफारस आर्थिक स्वरुपाची असून, अस्वीकृत करण्यात यावी.**<br>स्थानिक स्वराज्य संस्थांना जमिन महसूल उपकर हा मागणीनुसार नव्हे तर प्रत्यक्ष कर संकलनाच्या आधारे वितरीत करण्यात यावा. |

# परिशिष्ट-ब

## ब. प्रशासकीय स्वरुपाच्या शिफारशी.
## ब(१). प्रशासकीय स्वरुपाच्या स्वीकृत शिफरशी.

| अ. क्र. | शि. क्र. | शिफारशी | शिफारशींवर विभागाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|
| १. | * शिफारस क्र. १० (८.५) | महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ यानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची मालमत्ता कर यंत्रणा बळकट आणि प्रमाणित करण्यासाठी एका खास प्राधिकरणाची योजना होती. तथापि, असे मंडळ अद्याप स्थापन झाले नाही.<br>महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ अंतर्गत -महाराष्ट्र नगर मालमत्ता कर मंडळ॰ तातडीने स्थापन करावे, अशी आयोग शिफारस करत आहे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ मधील तरतूदीचा अभ्यास करुन कायद्यात सुसंगत सुधारणा करावी. |
| २. | * शिफारस क्र. ११ (८.६) | -महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या॰ व्याप्तीमध्ये ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या अधिनियमान्वये स्थापन झालेल्या आहेत (ग्राम पंचायती) त्यांचा समावेश होत नाही.<br>या अधिनियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन -महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या॰ व्याप्तीमध्ये ग्राम पंचायतींचा समावेश करावा, अशी आयोग शिफारस करत आहे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>ग्राम विकास विभाग व नगर विकास विभाग यांनी समन्वयाने महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ मधील तरतूदीचा अभ्यास करुन, स्थानिक स्वराज्य संस्था मालमत्ता प्राधिकरण स्थापन करण्याच्या अनुषंगाने कायद्यात सुसंगत सुधारणा करण्यात यावी. |
| ३. | * शिफारस क्र. १२ (८.७) | -महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या॰ सध्याच्या कार्यकक्षेत वापरकर्ता शुल्क, पाणीपट्टी आणि विशेष पाणीपट्टी, विकास कर आणि थकबाकीची वसुली यांसारख्या सर्व स्थानिक महसूल स्त्रोतांचा समावेश नाही. सर्व स्थानिक महसूल स्त्रोतांच्या कार्यक्षम वसुलीसाठी यंत्रणा विहित करण्याकरिता -महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाची॰ नियामक भूमिका विस्तारण्याची शिफारस आयोग करतो. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभागाने त्यांच्या २०११ च्या अधिनियमातील तरतूदींचा अभ्यास करुन, स्थानिक महसूल स्त्रोतांच्या कार्यक्षम वसुलीसाठी यंत्रणा विहित करण्याकरिता महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाची नियामक भूमिका विस्तारण्यासाठी कायद्यात सुसंगत सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. |
| ४. | * शिफारस क्र. १३ (८.९) | काही मोठ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मालमत्ता कर व्यवस्थापनासाठी स्वतंत्र संगणकीय व्यवस्था विकसित केल्या आहेत. परंतु, बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांकडे मर्यादित क्षमता आणि मर्यादित वित्तीय सहाय्य असते. त्यामुळे मालमत्ता कर व्यवस्थापन विखुरलेल्या स्थितीत असते. परिणामी, अप्रमाणित अभिलेख तयार होतात व राज्य स्तरीय संनियंत्रण व महसूलात सुधारणा या बाबी कमकुवत होतात.<br>नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व कर आणि करेतर महसुलाची आकारणी, संकलन, मूल्यांकन आणि देखरेखीसाठी एकीकृत, राज्य-स्तरीय डिजिटल प्लॅटफॉर्म (संगणकीय प्रणाली) स्थापित करण्याची, आयोग शिफारस करतो. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभाग व ग्राम विकास विभागामार्फत सर्व कर संकलनासाठी सद्य:स्थितीत कार्यरत असलेली संगणकीय प्रणाली राज्यस्तरीय डिजिटल प्लॅटफॉर्मवर एकत्रित स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात यावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | * शिफारस क्र. १४ (८.११) | काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मालमत्ता मूल्यांकन सुधारण्यासाठी जीआयएस (GIS)/ लिडार(LiDAR)/ ड्रोन (Drone) सर्वेक्षणांचा वापर केला आहे. बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अशा क्षमतेचा अभाव आहे. भारत सरकारच्या 'नक्शा (NAKSHA)' या प्रायोगिक प्रकल्पाद्वारे आता निवडक शहरांमधील ही कमतरता दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.<br>आयोग शिफारस करतो की, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जीआयएस-आधारित मालमत्ता सर्वेक्षण फ्रेमवर्क म्हणून 'नक्शा (NAKSHA)' योजना स्विकारावी, ज्यासाठी नगर विकास विभाग वेळोवेळी अर्थसंकल्पीय सहाय्य प्रदान करेल. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीतील मालमत्तांचे नक्षा योजनेच्या माध्यमातून मॅपिंग करण्यात यावे. त्यासाठी नगर विकास विभागाने आवश्यक असणारा निधी विहीत मार्गाने अर्थसंकल्पीत करण्याची कार्यवाही करावी. |
| ६. | * शिफारस क्र. १५ (८.१३) | स्वामित्व (SVAMITVA) योजनेमध्ये गावठाणांतील मालमत्तांचे सर्वेक्षण झाले आहे. तथापि, गावठाणांतील क्षेत्रांच्या बाहेरही खूप विकास झाला आहे. या ठिकाणी ग्रामपंचायतीने नागरी सेवा पुरवल्या आहेत तरीही सध्या या भागाचे संपूर्ण सर्वेक्षण झालेले नाही व त्यावर करही आकारला जात नाही. जीआयएस (GIS) आणि ड्रोन (Drone) आधारित सर्वेक्षण माध्यमातून गावठाण क्षेत्राबाहेरील क्षेत्रांचे सर्वेक्षण करण्यासाठी स्वामित्व (SVAMITVA) योजना विस्तारित करावी, अशी शिफारस आयोग करीत आहे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>स्वामीत्व योजनेचा विस्तार करुन, गावठाण हद्दीबाहेरील मालमत्तांसाठी स्वामीत्व योजना लागू करावी. यासाठी ग्राम विकास विभागाने महसूल व वन विभागाशी समन्वय साधून कार्यवाही करण्यात यावी. |
| ७. | * शिफारस क्र. १६ (८.१४) | 'नक्शा (NAKSHA)' 'स्वामित्व (SVAMITVA)' आणि विस्तारित 'स्वामित्व (extended SVAMITVA)' योजनेंतर्गत सर्वेक्षण केलेल्या प्रत्येक मालमत्तेला एक वैशिष्ट्यपूर्ण मालमत्ता ओळख क्रमांक (Unique Property ID) देण्याची आयोग शिफारस करतो. हे -महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था महसूल पोर्टल' मध्ये संकलित केले जावे आणि इतर संबंधित डेटाबेसशी जोडले जावे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>ग्राम विकास विभाग व नगर विकास विभागाकडून वेगवगळया पोर्टलवर ओळख क्रमांक देत आहे. महसूल पोर्टलवर ओळख क्रमांक संकलीत करण्याच्या अनुषंगाने नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग व महसूल विभाग यांनी समन्वयाने कार्यवाही करावी. |
| ८. | * शिफारस क्र. १७ (८.१६) | वार्षिक दराचे विवरणावर (ASR) आधारित मालमत्तेचे भांडवली मूल्य (CV) आणि मालमत्तानिहाय विशिष्ट घटकांवर आधारित मालमत्ता कर प्रणालीमुळे मालमत्ता कराचे पारदर्शक मूल्यांकन व स्वमूल्यांकन करणे शक्य आहे. ही पद्धत ग्रामपंचायतीमध्ये व काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था जसे बृहन्मुंबई महानगरपालिका, नांदेड - वाघाळा शहर महानगरपालिका, कोल्हापूर महानगरपालिका, बदलापूर नगर परिषद आणि सावदा नगर परिषद यामध्ये परिणामकारक ठरली आहे. त्याद्वारे तेथे महसुलात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले आहे. आयोग शिफारस करतो की, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एका वर्षाच्या आत भांडवली मूल्य (CV) आधारित मालमत्ता कर प्रणाली लागू करावी, आणि तिची अंमलबजावणी व वार्षिक दराचे विवरण (ASR) सोबतची जोडणी -महाराष्ट्र नगर मालमत्ता कर मंडळाच्या (MMPTB)◦ देखरेखीखाली असावी. मालमत्ता कराची ही भांडवली मूल्य (CV) आधारित प्रणाली कामगिरी आधारितअनुदानाशी (performance grants) जोडली जावी. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभागाकडून यासंदर्भात संबंधित कायद्यामध्ये सुधारणा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. |
| ९. | * शिफारस क्र. १८ (८.२०) | व्यापार परवान्यामुळे शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना धोकादायक व्यवसायांचे नियमन करणे शक्य होते, परंतु अनेक व्यावसायिक आस्थापना आणि व्यावसायिक नोंदणीकृत नाहीत, ज्यामुळे स्थानिक नियोजन, सेवा पुरवठा, जोखीम व्यवस्थापन आणि व्यवसाय कर संकलन कमकुवत होते. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>ग्राम विकास विभागाने स्थानिक शासन व्यावसायिक ओळखपत्राच्या (LGCI) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आयोग शिफारस करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हद्दीत कार्यरत असलेल्या सर्व आस्थापनांसाठी त्वरित मंजुरीवर आधारित स्थानिक शासन व्यावसायिक ओळखपत्र (LGCI) सुरू करावे आणि त्याची अंमलबजावणी अनिवार्य करावी. | अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. |
| १०. | * **शिफारस क्र. १९ (८.२३)** | काही लहान स्थानिक स्वराज्य संस्थांची महसूल मिळण्याची क्षमता कमी असते व त्यांची आर्थिक पत कमी असते. त्यांना भाड्यापासून मिळणारे उत्पन्न कुंठित झालेले असते. त्यामुळे खाजगी गुंतवणुका आकर्षित करण्याची त्यांची क्षमता कमी झालेली असते. आयोग स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी सार्वजनिक/खाजगी भागीदारी (PPP) सक्षम करण्याच्या उद्देशाने सहा महिन्यांच्या आत **स्थानिक स्वराज्य संस्था सार्वजनिक/खाजगी भागीदारी (PPP) मार्गदर्शक पुस्तिका** तयार करण्याची शिफारस करतो. प्राधान्यक्रम, क्लस्टरिंग, संस्थात्मक सहाय्य, मंजुरी प्रक्रिया आणि खरेदी (Procurement) यांसाठी मानकीकृत चौकट उपलब्ध करून दिली जाईल. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नियोजन विभागामार्फत शासन निर्णय, दिनांक ५ मार्च, २०२६ नुसार महाराष्ट्र सार्वजनिक खाजगी भागीदारी धोरण, २०२६ घोषित केले आहे. नगर विकास व ग्राम विकास विभागाने नियोजन विभागाशी समन्वय साधून मार्गदर्शक पुस्तिका तयार करावी. |
| ११. | * **शिफारस क्र. २० (८.२५)** | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना खाजगी-सार्वजनिक भागीदारीवर आधारित योजना यामधून भााड्याचे उत्पन्न वाढवण्यासाठी खूप क्षमता आहे, असे निदर्शनास आले आहे. त्याद्वारे मालमत्तेचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षमरीत्या करता येईल.<br>स्थानिक स्वराज्य संस्था स्थानिक पातळीवर ३० वर्षांपर्यंत मालमत्ता भाड्याने (लीजवर) देऊ शकतील अशा तऱ्हेने नागरी कायद्यांमध्ये दुरुस्त्या कराव्यात. त्याद्वारे दीर्घकालीन भांडवल आकर्षित करणे, भाड्याचे अधिमूल्य वाढवणे आणि पायाभूत सुविधांचा विकास करणे या गोष्टी करता येतील. सार्वजनिक कार्यासाठी माल / सेवा / वस्तू प्राप्त करण्यासाठीची पद्धती / निविदा पद्धती यांचा अवलंब स्थानिक स्वराज्य संस्थांनी काटेकोरपणे केला पाहिजे. यामध्ये कोणताही बदल करावयाचा असेल तर त्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल अशी शिफारस आयोग करत आहे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>स्थानिक स्वराज्य संस्थांकडून अधिकारांचा गैरवापर होऊ नये याकरीता सरसकट अधिकार प्रदान न करता, ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांना मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांना जिल्हाधिकारी आणि महानगरपालिकांसाठी अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांची पूर्व मंजूरी आवश्यक करण्यात यावी. याबाबत नगर विकास विभाग व ग्राम विकास विभागाकडून अस्तित्वातील कायदा तसेच शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात यावी. |
| १२. | * **शिफारस क्र. २१ (८.२८)** | बांधकाम परवानगी देण्याचा ग्रामपंचायतींचा अधिकार गावठाण क्षेत्रांपर्यंत मर्यादित आहे. त्यामुळे रहिवाशांना गावठाणाबाहेरील क्षेत्रांसाठी जिल्हा कार्यालयांमधून परवानग्या घ्याव्या लागतात. यावरुन ग्रामपंचायतींना सेवा प्रदान करण्यासाठी आणि अधिक महसूल वाढवण्यासाठी वाव आहे हे सिद्ध होते. ज्या ग्रामपंचायतींची लोकसंख्या २००० पेक्षा कमी आहे व ज्या ग्रामपंचायती जवळच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ५ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर आहेत त्यांना गावठाण क्षेत्राबाहेरील बांधकामांसाठी परवानगी देण्याचे अधिकार देण्यात यावेत. यासाठी संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्यात अशी शिफारस आयोग करत आहे. तसेच आयोग पुढे असेही निर्देश देतो की, ग्रामपंचायतींना बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम (BPMS) मध्ये सुलभ कार्यप्रणालीसह स्वतंत्र लॉगिन प्रदान केले जावेत आणि ९ मीटरपेक्षा कमी उंचीच्या प्रमाणित G+1 निवासी इमारतींसाठी वास्तुविशारद आराखड्याची आवश्यकता काढून टाकावी. ग्रामपंचायत स्तरावर BPMS चालवणे शक्य | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>सदर शिफारशीची अंमलबजावणी परिणामकारकरित्या होण्याच्या अनुषंगाने ग्राम विकास विकास विभागाने नगर विकास विभागाशी समन्वय साधून, मॉड्यूल तयार करण्याची कार्यवाही करावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | व्हावे यासाठी ग्रामपंचायतींना माहिती तंत्रज्ञान आणि हार्डवेअर सहाय्य तसेच मार्गदर्शक तत्त्वे प्रदान केली पाहिजेत. | |
| १३. | * शिफारस क्र. २२ (८.३०) | सार्वजनिक पार्किंगचे नियमन करताना महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था मॅन्युअल, विखुरलेल्या आणि रोख-आधारित प्रणालींवर अवलंबून आहेत, ज्यात अंमलबजावणी कमकुवत आहे आणि माहिती (डेटा) कमतरता आहे. यामुळे महसुली उत्पन्नात घट आणि वाहतूक कोंडी होते, जे राज्य-स्तरीय पार्किंग आराखड्याची आवश्यकता दर्शविते.<br>आयोग शिफारस करतो की, टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीच्या योजनेसह राज्य पार्किंग धोरण तयार करून अधिसूचित केले जावे, जे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्तरावर पार्किंग संचालन, झोनिंग, डिजिटल एकीकरण आणि विक्रेता व्यवस्थापनासाठी मानके प्रस्थापित करेल. माहिती तंत्रज्ञान विभागाने राज्य-स्तरीय डिजिटल पार्किंग प्लॅटफॉर्म विकसित करून कार्यान्वित करावा. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>ग्राम विकास विभाग व नगर विकास विभाग यांच्या समन्वयाने पार्किंग धोरण निश्चित करण्यात यावे. त्यानुषंगाने आवश्यक तांत्रिक सहाय्य इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात यावे. |
| १४. | * शिफारस क्र. २३ (८.३३) | महाराष्ट्राचे राज्यव्यापी बाह्य जाहिरात फलक धोरण आणि कायदे स्थानिक स्वराज्य संस्थांना जाहिरातींचे नियमन करण्यास आणि त्यातून महसूल मिळवण्यास सक्षम करतात. परंतु, विशेषतः सूक्ष्म स्थावर मालमत्तेच्या बाबतीत व्याप्तीमध्ये त्रुटी आहेत, ज्यामुळे या क्षेत्राच्या संपूर्ण महसूल क्षमतेवर मर्यादा येतात.<br>आयोग शिफारस करतो की, मानक कार्यप्रणाली (SOPs) विकसित करून अनिवार्य केल्या जाव्यात, ज्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना जाहिरातींसाठी सूक्ष्म स्थावर मालमत्ता भाड्याने देता येईल आणि मोठ्या जाहिरात फलकांऐवजी स्ट्रीट फर्निचरवर लक्ष केंद्रित करता येईल. आयोग पुढे आदेश देतो की, ६० दिवसांच्या आत, परवाना आणि देखरेखीसाठी पथदिवे, बस थांबे, सार्वजनिक शौचालये आणि इतर तत्सम मालमत्तांना युनिक डिजिटल आयडी (क्यूआर कोड) सह टॅग करण्यासाठी जीआयएस-आधारित मालमत्ता गणना केली जावी. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>ग्राम विकास विभागाने ग्रामपंचायतींना त्यांच्या हद्दीत, जाहिरात/फलक धोरण मसुदा तयार करण्यासाठी दि.०६.०५.२०२५ अन्वये समिती गठीत केली आहे. सदर समितीने त्यांचा अहवाल सादर केला आहे. जाहिरात / फलक धोरण तयार करुन मानक कार्यप्रणाली (SOP) विकसित करण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करावी. तसेच, नगर विकास विभागामार्फत अस्तित्वातील जाहिरात धोरणामध्ये योग्य ते बदल करण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| १५. | * शिफारस क्र. २४ (९.८) | "महाराष्ट्र राजकोषिय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन कायदा" या कायद्यामुळे राज्य स्तरीय वित्तीय शिस्तीचे नियमन केले जाते. याच उद्देशानुसार महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन (एम एल बी एफ आर बी एम) कायदा तयार करावा आणि पारित करावा अशी आयोग शिफारस करतो. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभाग तसेच ग्राम विकास विभागामार्फत "महाराष्ट्र राज्यकोषीय उत्तदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन कायदा" या कायद्याच्या धर्तीवर नागरी तसेच ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महाराष्ट्र नागरी / ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था उत्तरदायित्व व अर्थसंकल्पिय व्यवस्थापन कायदा वित्त विभागाच्या सहमतीने करण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| १६. | * शिफारस क्र. २५ (९.११) | स्थानिक स्वराज्य संस्था अर्थसंकल्प तयार करतात, परंतु अहवाल मानकांचे पालन न केल्यामुळे, विश्वसनीय लेखापरीक्षण अहवाल उपलब्ध होत नाहीत.<br>आयोगाने सध्या अस्तित्वात असलेल्या लेखा नियमावलींचे आणि संहितांचे स्थानिक स्वराज्य संस्थांनी काटेकोरपणे पालन करावे, तसेच लेखापरीक्षण | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>अस्तित्वातील लेखा नियमावलीतील आणि संहितांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अनुषंगाने व लेखा परिक्षण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अहवाल सादर करण्यासाठी आणि सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल शासनाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी एक अंतिम तारीख निश्चित करावी अशी आयोग शिफारस करतो. | अहवाल विहित कालावधीत शासनाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यपध्दती दोन्ही विभागांच्या समन्वयाने करण्यात यावी. |
| १७. | * शिफारस क्र. २६ (९.१४) | वैधानिक लेखापरीक्षण करण्यासाठी कायदेशीर चौकट असूनही, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लेखापरीक्षणांना दिरंगाई होणे, लेखापरीक्षणाची उत्तरे प्रलंबित राहणे तसेच लेखा निरीक्षणांची योग्य पूर्तता न होणे यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे नुकसान होते. वित्तीय व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी एक साधन म्हणून लेखापरीक्षणाचा वापर न होणे या गोष्टी आढळून येतात. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना योग्य लेखापरीक्षण प्रणाली लागू आहे, तथापि, ती नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वापरली जात नाही. आयोगाने सध्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वापरली जाणारी ऑनलाइन लेखापरीक्षण यंत्रणा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी वापरावी. त्यामुळे समान लेखापरीक्षण पद्धती अवलंबणे, लेखापरीक्षण निरीक्षणांचा परिणामकारक मागोवा घेणे आणि वित्तीय पारदर्शकता या गोष्टी साध्य होतील अशी शिफारस आयोग करत आहे. आयोग पुढे अशीही शिफारस करतो की, जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षण प्राधिकरण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी प्रमाणित केलेल्या **-सनदी लेखापाल संस्थांची विभागनिहाय नामिकासूची** (Panel)॰ तयार करावी. यासाठी त्यांनी Institute of Public Auditors of India (IPAI) व महाराष्ट्राचे महालेखापाल यांचा सल्ला घ्यावा. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभाग व ग्राम विकास विभागाने जिल्हा स्थानिक निधी लेखापरीक्षण प्राधिकरण यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी प्रमाणित केलेल्या -सनदी लेखापाल संस्थांची विभागनिहाय नामिकासूची (Panel)॰ तयार करावी. यासाठी त्यांनी Institute of Public Auditors of India (IPAI) व महाराष्ट्राचे महालेखापाल यांचा सल्ला घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. |
| १८. | * शिफारस क्र. २७ (९.१६) (९.१९) (९.२१) (९.२३) | वाढत्या सेवा प्रदानाची जबाबदारी आणि मर्यादित वित्तीय संसाधनांमुळे, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांना दीर्घकालीन सार्वजनिक मूल्य, आर्थिक क्षमता आणि प्रभावी सेवा प्रदान करण्यासाठी सुयोग्य खर्चाची आवश्यकता आहे.<br>यासाठी आयोग पुढील शिफारसी करतो -<br>स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे वस्तुनिष्ठ, परिणामकारक आणि मूल्य-आधारित प्रकल्पांची निवड सक्षमतेने करण्यासाठी, प्रकल्प प्राधान्य निर्देशांक व प्रकल्पांची प्रतवारी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरविणे.<br>सदर निर्देशांकाबरोबर जोडलेली ५ वर्षांची भांडवली गुंतवणूक योजना सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार करणे अनिवार्य करावे. योजनांचे संनियंत्रण दर दोन वर्षांनी जिल्हाधिकारी यांनी करावे.<br>सर्व विभागांत कामांची किंवा प्रदानांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून तसेच काम पूर्ण झाले की नाही आणि देयके प्रदान झाली किंवा नाही यांचा मागोवा घेण्यासाठी राज्यव्यापी कार्य व्यवस्थापन यंत्रणा विकसित करावी व यात रिअल टाइम जीआयएस डॅशबोर्ड याचा वापर आणि प्रत्येक मालमत्तेला वैशिष्ट्यपूर्ण ओळख क्रमांक (Unique ID) देणे याचा समावेश असावा.<br>स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ई-निविदा प्रक्रिया बंधनकारक करण्यासाठी, खरेदी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करण्यासाठी तसेच शाश्वतता, हवामान बदल प्रतिकारक्षमता आणि संसाधन कार्यक्षमतेचा समावेश दैनंदिन कामकाजात करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे लागू करणे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वस्तुनिष्ठ, परिणामकारक आणि मूल्य-आधारित प्रकल्पांची निवड सक्षमतेने करण्यासाठी, प्रकल्प प्राधान्य निर्देशांक व प्रकल्पांची प्रतवारी करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याच्या अनुषंगाने तसेच ई-निविदा प्रक्रिया बंधनकारक करण्यासाठी, खरेदी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करण्यासाठी व शाश्वतता, हवामान बदल प्रतिकारक्षमता आणि संसाधन कार्यक्षमतेचा समावेश दैनंदिन कामकाजात करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याच्या अनुषंगाने नगर विकास विभाग व ग्राम विकास विभागाकडून योग्य त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात. |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | * **शिफारस क्र. २८** (९.२६) | स्थानिक स्वराज्य संस्थांनी हाती घेतलेल्या कामांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचे पर्यवेक्षण सुनिश्चित करण्यासाठी एका सुसंघटित आणि संस्थात्मक सामाजिक लेखापरीक्षण यंत्रणेची आवश्यकता आहे. आयोग शिफारस करतो की, नगर विकास विभाग आणि ग्राम विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांनी हाती घेतलेल्या कामांसाठी एक सर्वसमावेशक सामाजिक लेखापरीक्षण आराखडा विकसित करावा आणि तो राज्यव्यापी कार्य व्यवस्थापन प्रणालीमध्ये समाविष्ट करावा. आयोग अशीही शिफारस करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थांनी राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायत राज संस्था व भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षक यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण युनिट्सची स्थापना करून नागरिकांचा सहभाग संस्थात्मकरित्या सुनिश्चित करावा. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>सद्य:स्थितीत ग्राम विकास विभागाकडून मनरेगा योजनेचे सामाजिक लेखापरीक्षण केले जाते. त्या आधारे इतर योजनांचीही नगर विकास विभाग व ग्राम विकास विभागामार्फत सामाजिक लेखापरीक्षण युनिटची स्थापना करण्यात यावी. |
| २०. | * **शिफारस क्र. २९** (९.३०) | स्थानिक विकासासाठी कॉर्पोरेट सोशल रि स्पॉन्सिबिलिटी (CSR) निधीचा लाभ घेण्याची महाराष्ट्रात मोठी क्षमता आहे, परंतु सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्राधान्यक्रमाचे प्रकल्प ओळखण्यासाठी आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) निधीच्या योगदानकर्त्यांशी पद्धतशीरपणे संवाद साधण्यासाठी सुसंघटित यंत्रणांचा अभाव आहे.<br>आयोग अशी शिफारस करतो की, महानगरपालिका, जिल्हाधिकारी स्तरावरील जिल्हा प्रकल्प कार्यालये आणि जिल्हा परिषदा यांच्यामध्ये स्वतंत्र -**कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) कक्ष** स्थापन करावा. हा कक्ष कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) निधीची स्थानिक विकासाच्या प्राधान्यक्रमांशी स्पष्टपणे परिभाषित भूमिका आणि परिणामांसह, सक्रियपणे सांगड घालण्यासाठी काम करेल. आयोग पुढे अशीही शिफारस करतो की, स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त झालेल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधीचा मागोवा घेणे व महाराष्ट्र राज्यामध्ये केल्या जाणा-या कामांचा मागोवा घेणे यासाठी एक राज्यस्तरीय कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी पोर्टल स्थापन करावे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणखाली कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) कक्ष स्थापनेची तसेच राज्यातील सीएसआर निधीचा योग्य विनियोगासाठी स्टेट सीएसआर कक्षाची निर्मिती करण्यात यावी. तसेच याच धर्तीवर ग्राम विकास विभागाअंतर्गत जिल्हा स्तरावर सेल स्थापन करण्यात यावी. |
| २१. | * **शिफारस क्र. ३०** (९.३४) | नागरी पायाभूत सुविधांच्या वाढत्या गरजा आणि मर्यादित सार्वजनिक निधी यामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना महसुलाचे विविध पर्यायी स्रोत शोधणे, आणि म्युनिसिपल बाँड (Muncipal Bonds) सारखी पर्यायी वित्तीय साधने प्राप्त करण्यासाठी क्षमता निर्माण करणे हे आवश्यक आहे.<br>आयोग शिफारस करतो की, नगर विकास विभागाने सर्व २९ महानगरपालिकांनी स्वतःचे मूल्यांकन करण्याचे आणि मार्च २०३० पर्यंत किमान एक म्युनिसिपल बाँड जारी करण्याचे बंधन घालावे. म्युनिसिपल बाँडद्वारे वित्त व्यवस्था करण्यासाठी व संस्थांची क्षमता बळकट करण्यासाठी आयुक्त आणि महत्वाच्या अधिकाऱ्यांसाठी यशदाने सेबी, स्टॉक एक्सचेंज, पत निर्धारक संस्था आणि मर्चंट बँकर्स यांच्या सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत, अशी आयोग शिफारस करत आहे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभागाने केंद्र सरकारच्या बिनव्याजी कर्ज योजनेच्या धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी राज्यस्तरीय योजना तयार करुन, राज्यातील २९ महानगरपालिकांनी स्वत:चे मुल्यांकन करुन मार्च २०३० पर्यंत किमान एक म्युनिसिपल बाँड जारी करण्याचे बंधन घालण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. |
| २२. | * **शिफारस क्र. ३१** (९.३८) | स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रभावी देखरेख आणि धोरणनिर्मिती ही खंडित, बहुतांशी गैर-डिजिटल डेटा प्रणालींमुळे मर्यादित आहे, ज्यासाठी वारंवार डेटा प्रविष्ट करणे आवश्यक असते आणि त्यामुळे विसंगती निर्माण होतात व प्रशासकीय भार वाढतो.<br>आयोग शिफारस करतो की, नगरविकास विभाग, ग्रामविकास विभाग आणि माहिती तंत्रज्ञान विभागाने संयुक्तपणे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>महाराष्ट्र शासनाच्या सर्व योजना आणि सेवांचा लाभ घेण्यासाठी एकमेव लॉगिन यंत्रणा (Single Sign On (SSO)) म्हणून नागरिकांना महाआयडीचा उपलब्ध |

| | | | |
|---|---|---|---|
| | Appendix A: Suggestion from stackholders | एकच, राज्य-स्तरीय डेटा प्लॅटफॉर्म म्हणून 'युनिफाइड लोकल बॉडीज इन्फॉर्मेशन सिस्टीम (ULBIS)' ची रचना करून अंमलबजावणी करावी, जी विद्यमान प्रणालींशी सुसंगत असेल, जेणेकरून डेटाची व डेटा एन्ट्रीची पुनरावृत्ती टाळून विश्वसनीय संनियंत्रण, पर्यवेक्षण आणि पुराव्यांवर आधारित धोरणनिर्मिती सक्षम होईल.<br><br>**IT System Integration and the Samarth Portal:** The current "multiplicity and complexity" of various IT portals and dashboards like e-Gram Soft, Zilla Parishad Financial Management System (ZPFMS) and I-PAS often leads to administrative overload due to repetitive work and data entry. These systems can be integrated into a common Portal, providing a single-window dashboard for more effective monitoring and real-time financial transparency and monitoring. | करून देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाकडून महासारथी प्रकल्प राबविण्यासाठी यंत्रणा सुनिश्चित करण्यात आली असून दि.२७/०३/२०२६ रोजी त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. महासारथी प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व नागरिकांच्या माहितीचे एकत्रीकरण करुन सदर माहिती नागरिकांना देण्यात येणाऱ्या महाआयडीशी लिंक राहणार असल्याने प्रत्येक वेळी अर्ज करताना नव्याने माहिती भरण्याची तसेच कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची आवश्यकता राहणार नाही. महासारथी प्रकल्पांतर्गत निर्माण होणारी यंत्रणा संपूर्ण राज्यासाठी म्हणजेच सर्व विभागांच्या सर्व योजनांचे एकत्रिकरण करण्याची कार्यवाही इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभागाने करावी. |
| २३. | * **शिफारस क्र. ३२** (९.४१) | स्थानिक प्रशासन हे अधिकाधिक गुंतागुंतीचे होत चालले आहे व त्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांमध्ये अधिकाधिक प्रशासकीय, तांत्रिक आणि विशेष अशी कौशल्ये असणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांकरिता सर्वसमावेशक असा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला जावा. अधिकाऱ्यांकरिता प्रशिक्षण संस्था 'यशदा' मार्फत प्रशासकीय प्रशिक्षण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका क्षमता बांधणी व संशोधन केंद्र (एमसीएमसीआर) मार्फत तांत्रिक प्रशिक्षण दिले जावे. तसेच, अग्निशमन सेवांसारखे विशेष प्रशिक्षण निर्दिष्ट संस्थांमार्फत देण्यात यावे, असेही आयोग सुचवितो. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२३.०९.२०११ अन्वये राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित केले आहे. नगर विकास विभाग तसेच ग्राम विकास विभाग यांनी आवश्यकतेनुसार यशदा या प्रशिक्षण संस्थेशी संपर्क साधून तांत्रिक प्रशिक्षण आयोजित करण्याची कार्यवाही करावी. |
| २४. | * **शिफारस क्र. ३३** (९.४४) | महाराष्ट्रामधील नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कर्मचाऱ्यांची भरती व तत्सम अन्य बाबींबाबतचे निकष हे कालबाह्य झाले आहेत. जे की सध्याच्या दर्जेदार सेवा पुरवठ्याची आवश्यकता, तांत्रिक गरजा, स्थानिक स्वराज्य प्रशासनातील गुंतागुंत व निम-शहरी भागातील (Peri-Urban Area) आवश्यकता पूर्ण करीत नाहीत.<br>आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी संघटनात्मक रचना आणि कर्मचारी भरती निकषांचे पुनरावलोकन आणि पुनर्रचना करण्यासाठी, राज्य-स्तरीय तज्ञ समिती स्थापन करण्याची शिफारस केली आहे. तसेच, योग्य तांत्रिक आणि प्रशासकीय भूमिका दर्शवणारे संघटनात्मक आराखडे तयार करणे, आणि विकसित होत असलेल्या प्रशासकीय गरजांशी सुसंगत राहण्यासाठी दर दहा वर्षांनी अशा आराखड्यांचे पुनर्विलोकन करणे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नगर विकास विभागामार्फत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी संघटनात्मक रचना आणि कर्मचारी भरती निकषांचे पुनरावलोकन आणि पुनर्रचना करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच, योग्य तांत्रिक आणि प्रशासकीय भूमिका दर्शवणारे संघटनात्मक आराखडे तयार करणे, आणि विकसित होत असलेल्या प्रशासकीय गरजांशी सुसंगत राहण्यासाठी दर दहा वर्षांनी अशा आराखड्यांचे पुनर्विलोकन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. तसेच यानुषंगाने ग्राम विकास विभागाने गठीत केलेल्या समितीच्या प्राप्त |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद संवर्गाचे सेवाप्रवेश नियम सुधारीत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी. |
| २५. | * शिफारस क्र. ३४ (९.४७) | महाराष्ट्राच्या निम-शहरी भागांमधील लोकसंख्येच्या जलद वाढीमुळे विद्यमान ग्रामीण प्रशासकीय व्यवस्था अपुरी पडली आहे, ज्यामुळे नियोजन क्षमता, सेवा वितरण आणि संस्थात्मक सज्जता यामध्ये त्रुटी दिसून येतात. या वस्त्यांमध्ये शहरी/नागरी गरजा वाढत आहेत, परंतु त्यांच्याकडे त्याप्रमाणात सुयोग्य संक्रमण (Transition) यंत्रणा नाही.<br>आयोगाच्या निरीक्षणांनुसार ग्रामीण-शहरी संक्रमण धोरण तयार करण्यासाठी नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग आणि वित्त विभाग यांचा समावेश असलेली एक बहुविभागीय समिती स्थापन करण्याची शिफारस आयोग करतो. यामध्ये निम-शहरी ग्रामपंचायतींना औपचारिक मान्यता, कर्मचारी भरती निकष, अनिवार्य संरचना आराखडे आणि मालमत्ता-दायित्व हस्तांतरण व संक्रमण (Transition) अनुदानांच्या तरतुदींसह संक्रमणासाठी एक कालमर्यादित आराखडा यांचा समावेश राहील. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>ग्रामीण-शहरी संक्रमण धोरण तयार करण्यासाठी नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग आणि वित्त विभाग यांचा समावेश असलेली एक बहुविभागीय समिती स्थापन करण्याबाबत ग्राम विकास विभागामार्फत प्रस्ताव सादर करण्यात यावा. |
| २६. | * शिफारस क्र. ३५ (९.५०) | स्थानिक स्वराज्य संस्था अनेकदा एकाच वेळी अनेक प्रकल्पांना मंजुरी देऊन मर्यादित निधीपेक्षा जास्त खर्च करण्याचे वचन देतात, ज्यामुळे निधीविना प्रलंबित देयके आणि अपूर्ण कामे निर्माण होतात, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती कमकुवत होते.विद्यमान राज्य मार्गदर्शक तत्त्वे नवीन प्रकल्प हाती घेण्यापूर्वी चालू कामे पूर्ण करण्यास प्राधान्य देण्यावर आधीच भर देतात. आर्थिक दायित्वे मर्यादित करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू असलेल्या संबंधित कायद्यांमध्ये एक अनिवार्य चौकट औपचारिकपणे संहिताबद्ध करण्याची शिफारस आयोग करतो. आर्थिक शिस्त आणि प्रकल्पांची वेळेवर पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी, चालू आणि मंजूर कामांचा हिशेब केल्यानंतर उपलब्ध असलेल्या आर्थिक क्षमतेच्या १.५ पट मर्यादेपर्यंतच नवीन प्रशासकीय मंजुरी देणे अनिवार्य करण्याची शिफारस आयोग करीत आहे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>नियोजन विभाग, शासन निर्णय, दि.५.६.२०२६ अन्वये आर्थिक क्षमतेच्या मर्यादेत नविन प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत निश्चित केलेले धोरण स्थानिक स्वराज्य संस्थांना लागू करण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| २७. | * शिफारस क्र. ३६ (९.५४) | राज्य शासनाने पारित केलेले विविध कायदे, नियम आणि परिपत्रके, अधिसूचना या विविध ठिकाणी विखुरलेल्या असतात व त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना कामकाज करणे आणि विविध कायदे, नियम इत्यादींची पूर्तता करणे हे एक आव्हान झालेले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांसाठी, नागरिकांसाठी आणि व्यवसायांसाठी अपूर्ण आकलन, विसंगत अर्थ लावला जाणे आणि कार्यपद्धतीमधील चुकांचा धोका वाढतो.<br>आयोग अशी शिफारस करतो की, सर्व राज्य कायदे, नियम, विनियम, सरकारी ठराव, अधिसूचना आणि सुधारणा सामावून घेणारे एकच, एकत्रित डिजिटल कायदेशीर व्यासपीठ स्थापन करावे. सर्व विभागांनी या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या विकासासाठी डेटा/माहिती प्रदान करावी, ज्याला कायदेशीर स्पष्टता, सुसंगतता आणि प्रशासकीय कार्यक्षमता सुधारण्यासाठी एआयव्दारे-सक्षम क्रॉस-लिंकिंग करुन सतत अद्ययावत करणे अनिवार्य राहील. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>"राज्य अधिनियम, नियम, विनियमअधिसूचना, इत्यादींची एकत्रित डिजिटल स्वरूपाची माहिती केंद्र शासनाच्या "इंडिया कोड पोर्टल" या संकेतस्थळावर अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध असून राज्य अधिनियम या विभागामार्फत राजपत्रात प्रकाशित होत असल्याने ते उक्त संकेतस्थळावर एआयव्दारे-सक्षम क्रॉस-लिंकिंग करुन अद्ययावत स्वरूपात अपलोड करण्यात यावे. |
| २८. | * शिफारस क्र. ३७ | या आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांशी सल्लामसलत करून काही इतर आर्थिक आणि कार्यात्मक आव्हाने ओळखली आहेत, जी परिशिष्ट 'अ' मध्ये एकत्रित केली आहेत. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>ग्राम विकास विभाग व नगर विकास विभाग यांनी शिफारशीतीत उपस्थित केलेल्या |

| | | | |
|---|---|---|---|
| | (९.५७) | राज्य सरकारने या आव्हानांची तपासणी करावी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी शिफारस आयोग करतो. | समस्या व चिंतांचा सखोल अभ्यास करुन, समन्वयाने यासंदर्भात योग्य त्या उपायायोजना प्रस्तावित करण्याची कार्यवाही करावी. |
| २९. | * शिफारस क्र. ३८ (१०.०८) | आयोग अशी शिफारस करतो की, राज्य वित्त आयोगाची (SFC) संस्था सक्षम करण्यासाठी, महाराष्ट्र वित्त आयोग (MFC) अधिनियम, १९९४ मध्ये सुधारणा करण्याची शिफारस करतो. अधिनियमाचे उद्दिष्ट, आयोगाच्या स्थापनेसाठी कालमर्यादा विहित करून, राज्य वित्त आयोगाची परिणामकारकता आणि प्रासंगिकता वाढवणे हे असावे. याव्यतिरिक्त, अधिनियमाने स्पष्ट भूमिका आणि जबाबदाऱ्या परिभाषित कराव्यात; विस्तृत कार्यकक्षा (ToR) प्रदान कराव्यात; शिफारशी स्वीकारल्याच्या स्थितीचा कालमर्यादेत अहवाल देणे आणि शिफारशी नाकारण्याची कारणे देणे, कृती अहवाल (Action Taken Report) अनिवार्यपणे सादर करणे आणि योग्य देखरेख यंत्रणा प्रदान करणे आवश्यक आहे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेची कालमर्यादा, भूमिका व जबाबदाऱ्या, कार्यकक्षा, शिफारशी स्वीकार/अस्वीकारल्याचा अहवाल व कृती अहवाल यासाठी कालमर्यादा विहित करण्याची कार्यवाही करण्याकरीता अस्तित्वातील महाराष्ट्र वित्त आयोग (MFC) अधिनियम, १९९४ मध्ये सुधारणा करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी. |
| ३०. | * शिफारस क्र. ३९ (१०.०९) | राज्य वित्त आयोगाने केलेल्या शिफारशींवर केलेल्या कारवाईच्या देखरेखीसाठी एका स्थायी विशेष कृती पथक (Task force) स्थापनेची शिफारस आयोग करतो. या समितीचे अध्यक्ष (Chairman) राज्य शासनाने नियुक्त केलेले असतील, नगर विकास विभाग आणि ग्रामविकास विभागाचे सचिव हे सदस्य (Members) असतील आणि सचिव (वित्तीय सुधारणा) हे सदस्य-सचिव (Member-Secretary) असतील. अशा कार्यकारी समितीची आवश्यकता सुधारित महाराष्ट्र वित्त आयोग अधिनियम, १९९४ मध्ये नमूद करावी. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>सद्यस्थितीत वित्त विभाग, शासन निर्णय, दि.२०.०४.२०२६ अन्वये सहाव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या शिफारशींवरील कार्यवाहीकरिता छाननी समिती व टास्क फोर्स गठीत करण्यात आलेला आहे. तथापी, शिफारशीनुसार महाराष्ट्र वित्त आयोग अधिनियम, १९९४ मध्ये सुधारणा करताना समितीची आवश्यकता नमूद करावी. |
| ३१. | * शिफारस क्र. ४० (११.२) | महाराष्ट्र बॉरोईंग मॅच्युरिटी प्रोफाइलनुसार, २०३०-३३ या काळात परतफेडीचा उच्चांक दिसून येतो. आयोग अशी शिफारस करतो की, वित्त विभागाने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने, मध्यम-मुदतीची कर्ज व्यवस्थापन निती विकसित करावी. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासनाचे कर्जरोखे (SGS) उभारताना पाळावयाची मार्गदर्शक तत्त्वे /मानके (Adoption of Benchmark Issuance Strategy by States) निश्चित केली आहेत. याअंतर्गत ५ वर्षांपर्यंत, ५-१० वर्षे, १०-१५ वर्षे, १५-५० वर्षे, २०-३० वर्षे आणि ३० वर्षे आणि ३० वर्षोहून अधिक अशा सहा गटांमध्ये कर्जरोख्यांची उभारणी करण्यात येणार असून, कर्जाच्या परतफेडीचा बोजा विभागाला जावा याकरीता स्थूल राज्य उत्पन्नाच्या / महसूली जमेच्या मर्यादेत कर्ज उभारणी करण्यात येत आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | * शिफारस क्र. ४१ (११.४) | महाराष्ट्रातील संस्थांना/विभागांना क्लिष्ट कार्यपद्धती, कठोर कालमर्यादा आणि रिअल-टाइम अनुपालन ट्रॅकिंगच्या अभावामुळे केंद्र सरकारच्या अनुदानापर्यंत पोहोचण्यात अडचणी येतात व निधी प्राप्त होत नाही. योग्य योजना ओळखणे, प्रकल्प तयार करणे आणि केंद्र सरकारच्या आवश्यकतांचे वेळेवर पालन करण्यासाठी वित्त विभागात एक स्वतंत्र '**अनुदान व्यवस्थापन आणि देखरेख कक्ष**' स्थापन करण्याची आयोग शिफारस करतो. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>केंद्र पुरस्कृत योजना (CSS) / SASCI/१६वा FC/ इतर केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत निधी प्राप्तीचे निरीक्षण करण्यासाठी वित्त विभागामध्ये ASPIRE (Accessing Schemes & Planing for Inflows, Reforms and Expenditure) या नावाने कक्ष स्थापन करण्यास प्राप्त मंजूरीच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यात यावी. |
| ३३. | * शिफारस क्र. ४२ (११.६) | राज्याच्या विकेंद्रीकरण उपक्रम, निधीचे हस्तांतरण आणि ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना दिलेल्या आर्थिक मदतीची माहिती अधिकृत प्रकाशनांमध्ये सातत्याने किंवा सर्वसमावेशकपणे प्रकाशित केली जात नाही. आर्थिक सर्वेक्षण आणि राज्याच्या अर्थसंकल्पासारख्या महत्त्वाच्या दस्तऐवजांमध्ये पद्धतशीरपणे माहिती प्रसिध्द करणे महत्त्वाचे आहे. आयोग शिफारस करते की, वित्त विभागाने महाराष्ट्राच्या वार्षिक आर्थिक सर्वेक्षणामध्ये विकेंद्रीकरण उपक्रमांचा तपशील देणारे एक स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करावे व त्यात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीच्या हस्तांतरणाचे, स्तर-निहाय निधी प्रवाह यांची सविस्तर माहिती द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांना होणाऱ्या निधी प्रवाहाची माहिती राज्याच्या अर्थसंकल्पीय दस्तऐवजांचा भाग म्हणून उपलब्ध करून दिली पाहिजे. | **सदर शिफारस प्रशासकीय स्वरुपातील असून, स्वीकृत करण्यात यावी.**<br>सन २०२६-२७ च्या आगामी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी प्रकाशनात सदर विषय समाविष्ट करण्याबाबत नियोजन विभागाकडून कार्यवाही करण्यात यावी. |

******